# प्रेस नोट

अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव
दि.२८.०६.२०२२

आलोसे १) अनिल रामचंद्र अहिरे, वय–५१,व्यवसाय–नोकरी, सहाय्यक फौजदार ब.नं.२७२७, नेमणुक–चाळीसगांव शहर पोलीस स्टेशन २) शैलेंद्र आत्माराम पाटील, वय–३८, व्यवसाय–नोकरी, पोलीस नाईक ब.नं.७४४ नेमणुक–चाळीसगांव शहर पोलीस स्टेशन ता.चाळीसगांव जि.जळगांव (खाते पोलीस विभाग वर्ग–३) यांना ४,०००/– रुपये लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम स्वत: आलोसे क्रं.१ यांनी स्वीकारंताना ला.प्र.विभाग,जळगांव यांची कारवाई.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | **घटक** | :– | जळगांव. |
| २ | **गुन्हा नोंद क्रमांक** | :– | चाळीसगांव शहर पो.स्टे. गु.र.नं.०२७०/२०२२ |
| ३ | **कलम** | :– | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम–७ प्रमाणे. |
| ४ | **आरोपीचे नांव व कार्यालय** | :– | **१)** अनिल रामचंद्र अहिरे, वय–५१,व्यवसाय–नोकरी, सहाय्यक फौजदार ब.नं. २७२७, नेमणुक– चाळीसगांव शहर पोलीस स्टेशन रा.वैष्णवी पार्क, प्लॉट नं.४, धुळे रोड,चाळीसगांव ता.चाळीसगांव जि.जळगांव<br>**२)** शैलेंद्र आत्माराम पाटील, वय–३८, व्यवसाय–नोकरी, पोलीस नाईक ब.नं. ७४४ नेमणुक–चाळीसगांव शहर पोलीस स्टेशन रा.वैष्णव पार्क, तेजस कोनार्क, धुळे रोड, चाळीसगांव ता.चाळीसगांव जि.जळगांव<br>**(खाते पोलीस विभाग वर्ग–३)** |
| ५ | **मागणी केलेली लाचेची तारीख व रक्कम** | :– | दि.२८/०६/२०२२<br>प्रथम ५,०००/–रुपये व तडजोडीअंती ४,०००/–रुपये लाचेची मागणी |
| ६ | **स्विकारलेली लाचेची रक्कम** | :– | ४,०००/–रुपये. |
| ७ | **गुन्हा दाखल तारीख** | :– | दि.२९/०६/२०२२ |
| ८ | **थोडक्यात माहीती** | :– | यातील तक्रारदार यांच्या मुलीने दि.१९/०३/२०२२ रोजी चाळीसगांव शहर पोलीस स्टेशन येथे तिचे पती व सासरकडील इतर ०८ नातेवाईक यांचे विरुद्ध फिर्याद दिलेवरुन गु.र.नं.११३/२०२२ भादवि कलम–४९८ अ,४०६,३२३ वगैरे कलमान्वये गुन्हा दाखल आहे. सदर गुन्ह्याचा तपास आरोपी क्रं.१ हे करीत होते. तक्रारदार हे सदर गुन्ह्याचे तपासाबाबत विचारसुस करण्यासाठी चाळीसगांव शहर पोलीस स्टेशन येथे गेले असता, आरोपी क्रं.१ व २ यांनी तक्रारदारास तुमच्या मुलीने दाखल केलेल्या गुन्ह्यात तुम्हाला योग्य ती मदत करुन, गुन्ह्याचा तपास लवकरात लवकर व तुमच्या बाजुने करतो, तसेच, आरोपींविरुद्ध कोर्टात तात्काळ चार्जशीट दाखल करुन देतो,असे सांगुन ५,०००/–रुपये लाचेची मागणी केली. त्याबाबत तक्रारदार यांनी दि.२८/०६/२०२२ रोजी ला.प्र.वि. जळगांव कार्यालयाकडे तक्रार दिली होती.<br>सदर तक्रारीची अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव पथकाने पंच साक्षीदारा समक्ष दि.२८.०६.२०२२ रोजी पडताळणी केली असता यातील आलोसे क्रं.१ व २ यांनी तक्रारदार यांचे मुलीने दाखल केलेल्या गुन्ह्यात योग्य ती मदत करुन गुन्ह्याचा तपास लवकरात लवकर व तक्रादाराचे मुलीचे बाजुने करण्यासाठी तसेच,आरोपींविरुद्ध कोर्टात तात्काळ चार्जशीट दाखल करण्याच्या मोबदल्यात तक्रारदार यांचेकडेस पंचासमक्ष प्रथम ५,०००/–रुपये व तडजोडीअंती ४,०००/– रुपये लाचेची मागणी केली. त्यानंतर सदर लाचेची रक्कम आरोपी क्रं.२ यांच्या उपस्थितीत आरोपी क्रं.१ यांनी वर नमुद वेळी व ठिकाणी तक्रारदार यांचेकडुन पंचासमक्ष स्वत: स्वीकारली म्हणुन गुन्हा. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबधी काही माहीती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकांबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जळगांव कार्यालयात संपर्क करावा.

**संपर्क पत्ता:**– अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालय,जळगांव जिल्हाधिकारी कार्यालय परिसर,अल्पबचत भवन बिल्डींग,जळगांव.
**ईमेल आयडी:**– dyspacbjalgaon@gmail.com
**संकेतस्थळ:**– acbmaharastra.gov.in
**टोल फ्री क्रमांक:**– 1064,**दुरध्वनी क्रमांक:**–0257-2235477
**व्हॉटस्अॅप क्रमांक:**– 8766412529

पोलीस उप अधिक्षक अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव

28.6.2022

**शशिकांत श्रीराम पाटील**
**पोलीस उप अधिक्षक**
**अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव**